# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

ब-क्षेत्रिय कार्यालय, एल्प्रो कंपनी परिसर, लिंक रोड, चिंचवडगांव, पुणे-३३.
(नागरी व प्रशासकीय सेवेसाठी आयएसओ 9001:2008 प्रमाणपत्र प्राप्त संस्था)
Email – bward@pcmcindia.gov.in Website – www.pcmcindia.gov.in
दुरध्वनी क्रमांक – ०२०-२७३५०१५३

जावक क्र.-बक्षे/सभाशाखा/२/कावि/ २६ /२०१८ दिनाक ०३/०३/२०१८

प्रति,

मा. श्री./श्रीमती-------------------------------------------,

प्रभाग क्र.--------------------------------------------,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

पिंपरी – ४११ ०१८.

विषय : ब प्रभाग समितीची मासिक सभा दि. ०६/०३/२०१८ रोजी आयोजित केलेबाबत.

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दि. ०६/०३/२०१८ रोजी दु. १२.३० वाजता ब क्षेत्रीय कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली आहे. या पत्रासोबत सभेची कार्यपत्रिका पाठविण्यात येत आहे. तरी प्रस्तुत सभेस उपस्थित रहावे, हि विनंती कळावे,

आपला विश्वासू

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ब प्रभाग समिती

प्रत : सर्व संबंधित शाखा प्रमुख.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
ब प्रभाग समिती सभा
कार्यपत्रिका क्र. ९

दिनांक : ०६/०३/२०१८. वेळ : दु. १२.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा मंगळवार दिनांक ०६/०३/२०१८. रोजी दु. १२.३० वा. ब क्षेत्रीय कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित केली आहे. सभेत खालीलप्रमाणे कामकाज होईल.

अ) मागील कार्यपत्रिका क्र.७, दिनांक ६/२/२०१८ व दिनांक १४/२/२०१८ तसेच मागील कार्यपत्रिका क्रमांक ८, दिनांक १४/२/२०१८ रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करणे

विषय क्रमांक १ मोरया गोसावी क्रिडा संकुलच्या समोरील जाणारा तालेरा हॉस्पीटल रोड या रस्त्याला नांव देण्यात यावे. सदर जागा गावडे परिवाराची रस्त्यासाठी देण्यात आलेली आहे. सदरच्या रस्त्याला अदयाप कोणतेही नामकरण केलेले नसून सदर रस्त्यास कै.शंकरराव मारुती गावडे मार्ग असे नांव देण्याकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.सुरेश शिवाजी भोईर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक २ क्रांतीतीर्थ चापेकरवाडा येथील सार्वजनिक वाचनालयाकरीता वृत्तपत्रे देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ३ चिंचवड मोरया हॉस्पीटल समोरील व्यापारी संकुलाच्या दुस-या मजयावर सर्व सोयी सुविधायुक्त आर्ट गॅलरी व अत्याधुनिक ए सी हॉल करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ४ प्रभाग क्रमांक १६ ब किवळे येथे १) कै.बाळकृष्ण मारुती येळवंडे चौक, मामुर्डी २) हनुमान कॉलनी, आदर्शनगर मामुर्डी ३) कै.महादेव लक्ष्मण भोंडवे चौक, रावेत (पोलीस पाटील) ४) भगवान गोगादेव चौक, दत्तनगर असे नामफलक लावणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.प्रज्ञा महेश खानोलकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ५ मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने येणारे ऐनवेळचे विषय.

प्रशासन अधिकारी ता
सचिव (सभाशाखा)
ब प्रभाग समिती

क्र.-बक्षे/सभाशाखा/२/कावि/२८/२०१८
दिनाक – ०३/०३/२०१८